शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रूग्णालय,बारामती, पुणे येथे बी.ए.एम.एस. प्रथम वर्षाकरिता १०० विद्यार्थी प्रवेशास परवानगी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक: एएमसी-२०२१/प्र.क्र. १४७ / २१/शिक्षण-१
९ वा मजला, नविन मंत्रालय,गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१.
दिनांक:- १४ डिसेंबर, २०२२

वाचा:- १) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,समक्रमांकित शासन निर्णय दिनांक २०.०७.२०२१.
२) भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, नवी दिल्ली, आयुष मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.Ref No.-३-३/२०२२/MARB Ay (११६), दिनांक ०२.१२. २०२२.
३) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण,मुंबई यांचे पत्र क्र.आसंमु/शाआम./ बारामती /मान्यता/२०२२/आयु-२/१३९०३, दि.०६.१२.२०२२
४) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,समक्रमांकित शासन निर्णय दिनांक ०८.१२.२०२२.
५) भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, नवी दिल्ली, आयुष मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.Ref No.-३-३/२०२२/MARB Ay (११६), दिनांक १२.१२. २०२२.
६) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण,मुंबई यांचे पत्र क्र.आसंमु/शाआम./ बारामती /मान्यता/२०२२/आयु-२/१४२३५, दि.१४.१२.२०२२

शासन निर्णय

बारामती, पुणे येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नित १०० रूग्णखाटांचे रूग्णालय सुरु करणेसाठी आयुर्वेद महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, नवी दिल्ली, आयुष मंत्रालय, भारत सरकार यांनी संदर्भ क्र. (२) येथील पत्रान्वये १२५ विद्यार्थी प्रवेश क्षमतेसाठी (ईडब्ल्युएस सह) अटींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून मान्यता दिली होती. त्यानुषंगाने संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

तथापि आता भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, नवी दिल्ली, आयुष मंत्रालय, भारत सरकार यांनी संदर्भ क्र. (५) येथील पत्रान्वये " शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रूग्णालय, बारामती, जि.पुणे या आयुर्वेद महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी बी.ए.एम.एस. अभ्यासक्रमासाठी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह(ईडब्ल्युएस सह) अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने सदर आयुर्वेद महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये सुरू करण्यास व १०० विद्यार्थी (ईडब्ल्युएस सह) प्रवेशीत करण्यास परवानगी देण्यात येत आहे."

इतर अटी व शर्ती समक्रमांकित संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(डॉ. श्रीनिवास पुं. कोतवाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई

Scanned by CamScanner

२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
४) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६) सर्व मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधानभवन, मुंबई
८) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधानभवन, मुंबई
९) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
१०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
११) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई.
१२) संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई.
१३) संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
१४) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
१५) अधिष्ठाता,सर्व शासकीय आयुर्वेद महाविद्यालय
१६) अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती.
१७) जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, पुणे.
१८) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१९) सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ व ९ वा मजला, न्यु एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के. नायक मार्ग, फोर्ट-४००००१.
२०) सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी , वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१) निवडनस्ती (शिक्षण-१).

Scanned by CamScanner